

## डॉ. दीपा दिनेश सावळे/मोरे

(एम्.ए.एम.एड.पी.एच.डी.)

- परंडा तालुक्यातील भोंजा हे जन्मगाव. बार्शी हे सासर. जन्म २० जुलै १९५७, ७ वी पर्यन्त भोंजा येथे शिक्षण. ८ वी ते ११ वी सोनारी. प्री डिग्री ते एम्.एड. बार्शी. आणि पी.एच.डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (१९९९)
- १९८७ ते २०१३ - शिक्षण महर्षी गु.रा.गे. शिंदे महाविद्यालयात प्राध्यापक (इतिहास)
- २०१३ पासुन त्याच महाविद्यालयात प्राचार्य
- ६७ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधुन कृतीशील सहभाग.
- ६० शोधनिबंध प्रकाशित.
- १४ पुस्तके प्रकाशित.
- पाच विद्यार्थी एम.फील. व आठ विद्यार्थी पी.एच.डी.
- २००० ते २००५ इतिहास अभ्यास मंडळ सदस्य, डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद.
- २०११ ते २०१६ इतिहास अभ्यास मंडळ, अध्यक्ष डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद.
- डॉ. वीणाताई सुराणा महिला उत्कर्ष प्रतिष्ठानची अध्यक्ष.
- राष्ट्रसेवा दल सैनिक - १९९८ पासून.
- महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती, शाखा बार्शी, उपाध्यक्ष.
- विविध सामाजिक, शैक्षणिक संस्था व संघटनांमध्ये सक्रीय सहभाग.

# क्रांतीकारी संत कवयित्री

डॉ. दीपा दिनेश सावळे/मोरे



# क्रांतीकारी संत कवयित्री

डॉ. दीपा दिनेश सावळे/मोरे

❊ प्रकाशक ❊
सुविद्या प्रकाशन, सोलापूर
❊ सहकार्य ❊
शेती व ग्रामीण विकास संशोधन मंडळ,
आसु, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

*** प्रकाशन**

क्रांतीकारी संत कवयित्री
Krantikari Sant Kavayitri

*** प्रकाशक**

सुविद्या प्रकाशन
सोलापूर
ISBN No. : 978-81-921752-7-0



*** लेखिका**

प्राचार्या डॉ. दीपा दिनेश सावळे/मोरे
'शंतनु', २६७/१, सावळे चाळ,
सोलापूर रोड, बार्शी.
जि. सोलापूर - ४१३४११
मो.: ९८६०९७४२३५



*** सर्व हक्क**

दिनेश अंबऋषी सावळे



*** मुद्रक**

राज प्रिंटींग प्रेस
गवळे गल्ली, बार्शी. मो. ९८२२११७१६४

*** प्रथम आवृत्ती -**

ऑगष्ट, २०२०

*** सहकार्य**

शेती व ग्रामीण विकास संशोधन मंडळ, आसू.

*** किंमत - ₹ ७०/-**




# अर्पण

सर्व समाजासाठी कळत नकळत परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या त्यासाठी कुटुंबातुन व समाजातून विरोधास सामोरे जावुन स्त्रियांसाठी व एकंदर समाजासाठी परिवर्तनवादी चळवळीत कार्य करुन चळवळ पुढे घेऊन जाणाऱ्या जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, फातिमा शेख व समस्त स्त्रियांना समर्पित.

## * अनुक्रमणिका *

| | |
|---|---|
| १. महदाईसा उर्फ महदंबा उर्फ रुपाईसा | १ |
| २. मुक्ताबाई | ९ |
| ३. जनाबाई | १९ |
| ४. सोयराबाई | २६ |
| ५. निर्मलाबाई | ३० |
| ६. कान्होपात्रा | ३२ |
| ७. बहिणाबाई | ३६ |




### प्रस्तावना

# क्रांतीकारी संत कवयित्री

''क्रांतीकारी संत कवयित्री'' हा डॉ. दीपा सावळे यांचा लेखसंग्रह तरुणतरुणींना विषमतावादी रुढीरिवाजांना -झुगारुन निर्भयपणे आत्माविष्कार करण्याची प्रेरणा देणारा आहे.

भारतात चातुर्वर्ण्यपध्दतीने रुढ केलेल्या धर्मग्रंथात ज्ञान घेण्याचा हक्क स्त्री शुद्रांना नाकारला होता. संन्यास घेण्याची सुध्दा स्त्रीला परवानगी नव्हती. बौध्द व जैन धर्मांनी तरी परवानगी दिली. तेरा चौदाव्या शतकात भारताच्या विविध भागात भक्तीसंप्रदाय विकसित झाला. स्त्रीला देवाची भक्ती करण्याचा, धर्मग्रंथाचे व इतर ज्ञान संपादन करण्याचा, संन्यास घेऊन सर्वत्र एकटीने भ्रमण करण्याचा व भक्तीपर साहित्य रचण्याचा अधिकार आहे हे आपल्या कृतीने मान्य केले. धर्माचे ज्ञान घेण्याचा अधिकार स्त्रीशूद्रांना नाही. तसेच ते ज्ञान फक्त संस्कृत भाषेतच जतन करावे असा दंडक वैदिक परंपरेने घालून दिला होता. त्याविरूध्द बंड उभारून संत ज्ञानेश्वरांनी आपला ग्रंथ मराठीत लिहिला. त्यांच्या त्या विद्रोही कृतीने स्त्रीशूद्रांना धार्मिक ज्ञान घेण्याचा मार्ग मोकळा झाला, हे खरे असले तर त्यांनी आपल्या ग्रंथाची सुरूवात नमोजी आद्यावेद प्रतिपद्या अशी करून वेदांचे महत्व मान्य केले होते. आता तेही नाकारण्याची वेळ आली आहे. जगतगुरु तुकारामनीही 'वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा' असे म्हटले. मानवाला विवेकबुध्दीने जे पटते ते धर्मग्रंथातील आदेशांच्या विरुध्द असले तरी आपल्या कृतीत आणावे असे हे वळण संत कवयित्रींनीही आपल्या काव्यरचनेत कायम ठेवले आहे. वैदिक धर्मग्रंथ वगैरेच्या जागी त्यांनी विठ्ठलाला आपल्या भक्तीचे केंद्र बनविले. एक देव मानणे, हिंसाचार व अनिष्ट कर्मकांड नाकारणे (जाखाई, जोखाई पुजू नका - इति तुकाराम) केवळ मानवमात्रावर नव्हे तर प्राणिमात्रावर व वृक्षवल्लीवर प्रेम करावे ही शिकवण देणे - अशा मौलीक धर्मसुधारणा पश्चिम-दक्षिण भारतात वारकरी पंथाने केल्या. आपल्यावर होणाऱ्या सामाजिक अन्यायाविरुध्द संत महदाईसा, संत जनाबाई ते कान्होपात्रापर्यंत समस्त भक्तीमार्गी महिलांनी त्या विठ्ठलालाच साकडे घातले आहे. करुणा भाकली आहे.

तसे करताना नैतिक दृष्ट्या शुध्द असलेल्या आचरणामुळे त्यांना विलक्षण आत्मविश्वास प्राप्त -झाला आहे. 'देवतारक । देव दुष्टांसी मारक' असा सिद्धांत संत जनाबाई सांगून जाते. 'विश्व जालिया वन्हि । संतमुखे व्हावे पाणी' असे लहानगी मुक्ताबाई ज्ञानेश्वराला रोखठोकपणे सांगते.

सत्तांध व मदांध पुरुषांच्या विरुध्द हिंमतीने आरोळी ठोकताना कान्होपात्रा म्हणते.

पुरविली पाठ, न सोडी खळ । अधम चांडाळ पामराशी, त्यांना कठोर शासन कर असे ती जगतची जननी असलेल्या विठ्ठलाला आळवते.

दुष्टांना शिक्षा करण्यासाठी जनाबाई, कान्होपात्रा विठ्ठलाच्या पायाशी मिठी मारत होत्या. मात्र नाठाळाच्या माथी काठी हाणली पाहिजे असेही सांगितले.

विशाल संतसाहित्यसागरातून सात कवयित्रींचे विचारमोती निवडून दीपाताईनी मराठी वाचकांना आहेर केले आहेत. त्यांचे तेज आत्मसात केले पाहिजे. आता विज्ञानाने सृष्टीतील अनेक सत्ये खुली करुन दाखवली आहेत. आता अन्यायनिवारणासाठी देवाची करुणा भाकण्याऐवजी भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या बुद्धिगम्य आणि समाजहितकारी मूल्यांना प्रमाण मानून निर्भयपणे व एकजूटीने प्रयत्न करत राहीले पाहिजे. आपण आता तेवढे प्रगल्भ व निर्भय झालो आहोत असे नव्या पिढ्यांनी दाखवून दिले पाहिजे.

आपण संसार नेटका करतकरत परंडा सारख्या आडगावी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा भार सांभाळत, विविध सामाजिक कामांत योगदान देत देत आपला व्यासंग चालू ठेवून मराठी वाचकांना हे मौलिक पुस्तक सादर केल्याबद्दल डॉ. दीपाताई सावळे यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

**पन्नालाल सुराणा**
**आसू, ता. परंडा,**
**जि. उस्मानाबाद**
**ता. २० जुलै २०२०**



# मनोगत

मध्ययुगीन भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून स्त्रियांच्या स्थानाबाबत समाजाने दुटप्पीपणा केल्याचे दिसुन येते. एकीकडे ''यत्र नार्यस्तु पुजन्ते । रमन्ते तत्रं देवत:'' असे म्हणायचे आणि दुसरीकडे ''न स्त्री स्वातंत्र्य मर्हती'' असे म्हणुन तिला कायम दुय्यमत्त्व द्यायचे, असेच आजदेखील होत आहे.

मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचा समाजातील दर्जा खालावलेला होता. सतीप्रथा, बालविवाह, शिक्षणास विरोध यामुळे स्त्रियांचे जीवन चार भिंतीत बंदिस्त -झालेले होते. रुढी - परंपरांनी त्यांचे जीवन कुंठीत -झालेले होते. अशा अवस्थेतही संत कवयित्रींनी आपल्या काव्यातुन आपल्या समाजातील व्यथा व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

मध्ययुगीन कालखंडातील संत कवयित्रींनी त्यांच्या काव्यलेखनातुन स्त्री जीवनाच्या विविधांगावर प्रकाश टाकला आहे. समाजातील अनिष्ट रुढी परंपरेवर टीका करुन समाजाला अनिष्ट रुढी परंपरा नष्ट करण्यासाठी प्रबोधन केले आहे. पण त्याचवेळी त्या स्वत:ही त्या रुढी परंपरेला बळी पडल्याचे लक्षात येते.

संतानी स्त्री 'जन्म म्हणजे पाप' या विचारांपासुन स्त्रियांना दूर नेले. मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांना भक्तीचे स्वातंत्र्य देऊन त्यांच्या अध्यात्म विकासाची वाट मोकळी करुन दिली संत कवयित्रींना अध्यात्म क्षेत्रातील प्रेरणा संतापासुनच मिळाली . महदाईसाला चक्रधर स्वामींची प्रेरणा होती, संत मुक्ताबाईला निवृत्तीनाथ व -ज्ञानेश्वरांची प्रेरणा मिळाली. नामदेवांनी संत जनाबाईला प्रेरित केले तर बहिणाबाईला संत तुकारामांकडून प्रेरणा मिळाली. संत सहवासामुळे या संत कवयित्रींची काव्येही प्रभावी -झाली आहेत. अनाथ स्त्रीला संतांनी आधार दिला, गुलामगिरीतून तिची सुटका केली सुखदु:खाकडे बघण्याची डोळस, वैचारिक दृष्टी दिली. समानतेच्या जाचामुळे श्री चक्रधर स्वामींनी स्त्रियांना संन्यासदीक्षा दिली. -ज्ञानेश्वर महाराजांनी

स्त्रीचा आदर केला. तिला प्रतिष्ठा दिली. संत एकनाथांनी स्त्रियांना परमार्थाची वाट दाखविली. संतांच्या या स्त्रीविषयक उदात्त, दृष्टिकोणामुळे स्त्रीला विकासाची संधी मिळाली.

विधवा स्त्रियांनी पती निधनानंतर सती जाण्यापेक्षा मोक्षप्राप्तीसाठी अध्यात्माचा मार्ग आचरावा, आत्मविश्वासाने व चिंतन - मनन करुन विधवांनी मोक्षप्राप्तीच्या मार्गाकडे वळावे अशी शिकवण महदाईसाने देऊन स्वत:चा आदर्श विधवा स्त्रियांपुढे ठेवला.

यादवकालीन सांस्कृतिक इतिहासात मुक्ताबाईचे व्यक्तीमत्त्व विलक्षण तेजस्वी आहे. तिच्या अभंगाची संख्या फक्त ४३ एवढीच आहे. ती आत्मविश्वासाने व अधिकारवाणीने बोलते. मुक्ताबाई म्हणतात, ''ज्ञानाशिवाय भक्ती व्यर्थ आहे. जर भक्तीला ज्ञानाची जोड नाही तर अशी भक्ती काय कामाची.'' तिच्या अभंगाचे स्वरुप एका परमोच्च अशा -ज्ञानानुभवाचे स्थिर दर्शन घडविते.

जनाबाई संत नामदेवाच्या घरी काबाडकष्ट करणारी दासी होती. पण भक्तीच्या जोरावर तिने पांडूरंगाशी नाते जोडले. भक्ताला देवाशिवाय दुसऱ्या कोणाचा आसरा नाही, ईश्वर भक्त संबंध तिने काव्यातून व्यक्त केला आहे. खरी भक्ती अंत:करणात असते, असे जनाबाई म्हणते. दररोच्या कामकाजात देव आपला साथी व सहकारी आहे असे आभास तिला सतत होत. नामदेव, चोखामेळा, ज्ञानेश्वर इ. संतांचा सहवास तिला लाभला. जनाबाई ही शुद्र होती, दासी होती. तिच्या अभंगात तत्कालीन उच्चवर्णीय ब्राम्हण जातीने शुद्रांना दिलेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल टीकेचा सुर दिसून येतो. त्यांचा स्वार्थी हेतु व त्यांच्या गैरमार्गाने संपत्ती मिळविण्याच्या पध्दतीवर जनाबाईच्या अभंगातुन टिका आहे. त्यामुळे या अभंगातुन एक क्रांतिकारी कवयित्री अशी प्रतिमा दिसून येते.

सामाजिक, राजकीय, अर्थिक क्षेत्रातून उच्चाटन -झालेल्या स्त्रिया भक्तीमार्गातून पुढे आल्याचे दिसते. तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम रुढी - परंपरांच्या बंधनात राहुनही त्यांनी केलेले आहे.

कान्होपात्राने २४ अभंगातून आपल्या आयुष्याच्या शोकांतिकेचे चित्रण केले आहे तर बहिणाबाई अत्यंत बुदीमान, जागृत व विविध विषयावर अधिकार मिळविलेली स्त्री होती. विधवा स्त्रियांच्या दु:खमय जीवनाच्या भावनांचे चित्रण तिने



ओव्यातुन केले आहे. तिने एकूण ७७२ अभंगांची रचना केली. सोयराबाई, निर्मलाबाई याही संत कवयित्रींनी आपली दु:खमय जीवनाची कहाणी चित्रीत केली आहे. या सर्व कवयित्रींच्या साहित्याचा अल्पसा आढावा घेतला आहे.

भक्तीमार्गामुळे संतस्त्रियांना देव भेटल्याचा आभास होतो. आत्मचिंतन व भक्तीमार्गाने संत स्त्रियांनी स्वत:चा उध्दार करुन घेतला. धडपड, जिद्द, गुरुभक्ती इ. गुणांमुळे संत स्त्रिया श्रेष्ठ स्थानी पोहचल्या. त्या काळात भक्तीमार्गाने का होईना पण स्त्री शक्तीची जाणीव त्यानी करुन दिली. इतर क्षेत्रात तिला स्थानच नव्हते फक्त भक्तीचा मार्ग मोकळा होता. त्या भक्तीमार्गामुळे त्यांना स्वत:ची कोंडी थोड्याफार प्रमाणात फोडता आली. हे ही नसे थोडके.

**डॉ. दीपा सावळे - मोरे**